AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication Of Amravati Univercity

PART-TWO

गुरुवार, दिनांक 17 जुन, 1999

अधिसूचना

क्रमांक : 86/99.

दिनांक : 17.6.1999.

संदर्भ : 1) अमरावती विद्यापीठ अधिसुचना (असाधारण) क्र.42/1996,दि.16.4.96.
2) अमरावती विद्यापीठ अधिसुचना (असाधारण) क्र.55/1996,दि.26.4.96.
3) शासन अधिसुचना क्र.एससीआर-1895/(204/95)/युएनआय-3,दि.12.8.96.
4) शासनाचे पत्र क्र.एससीआर-1895/(204/95)/विशि-3,दि.21.11.96.
5) अमरावती विद्यापीठ अधिसुचना क्र.128/1996,दि.11.11.96.

शासनाने संदर्भ क्र.3 वरील अधिसुचनेअन्वये महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये प्रमाण संहिता नियम 1984 च्या नियम 10(1) मध्ये केलेली दुरुस्ती तसेच शासनाने संदर्भ क्र.4 वरील पत्रान्वये केलेले निर्वचन लक्षात घेता संदर्भ क्र.5 वरील अधिसूचनेअन्वये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळात बदल करण्यात आला आहे.

यासंदर्भात शासनाने पत्र क्र.एनजीसी-1793/2636/विशि-4 दि.3 जुन 99 अन्वये कळविल्या प्रमाणे महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती) नियम 1984 सर्व विद्यापीठांना लागू असून त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी न केल्यास पाचव्या वेतन आयोगाच्या आदेशानुसार वेतन श्रेणीतील पुनर्रचना झाल्याने विद्यापीठांना देय ठरणारे अनुदान दिले जाणार नसल्याने संदर्भ क्र.5 वरील अधिसूचनेअन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा खालीलप्रमाणे राहतील.

वर्ग-1,2 व 3 अधिकारी/कर्मचारी – सकाळी 10.30 ते संध्या. 6.10
वर्ग-4 कर्मचारी – सकाळी 10.00 ते संध्या. 6.30

विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा खालीलप्रमाणे राहतील.

वर्ग-1,2,3 व 4 चे अधिकारी/कर्मचारी – सोमवार ते शुक्रवार – 10.30 ते 6.00
शनिवार – 10.00 ते 2.20

(भोजनाची सुटी दुपारी 2.00 ते 2.30 राहील)

पदव्युत्तर शैक्षणिक विभाग प्रमुखांना त्यांच्या विभागातील शैक्षणिक कामाच्या वेळा लक्षात घेता उपरोक्त कार्यालयीन वेळेच्या अनुपातात सेवानियमानुसार सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेने बदल करता येवू शकेल.

सर्व अधिकारी व शैक्षणिक विभाग प्रमुखांनी सदर अधिसूचना त्यांच्या नियंत्रणाखाली कर्तव्यस्थ सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावी व अधिसूचनेनुसार कार्यालयीन वेळेची काटेकोरपणे पालन होईल याची काळजी घ्यावी.

कुलसचिव,
अमरावती विद्यापीठ.

*****